सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–००००५२–२०१९

नियमित दिवाणी दावा क्र. १२/२०१९

निशाणी क्र.८० वरील आदेश

वादीने हा अर्ज देऊन नि.क्र.६१ येथे वादीच्या अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र.१, ३, ४, ५ यांनी शपथेवर वादीने मागितलेल्या प्रश्नांची पूर्ण उत्तरे न देता अर्धवट उत्तरे दिलेली असल्यामुळे या उत्तरातून कोणताही बोध होत नसून उलटपक्षी अशा अर्धवट उत्तरामुळे आणखीन गोंधळ निर्माण झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींना सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास टाळाटाळ करता येणार नाही. हा दावा वाटपाचा असून वाटपामध्ये प्रत्येक पक्षकार वादीचे भूमिकेत असतो हे कायद्याचे तत्व आहे. त्यामुळे प्रश्नांची सरळ व सत्य अशी अर्धवट नसलेली उत्तरे दिल्यामुळे प्रतिवादीचे कसलेही नुकसान अगर हितास बाधा होणार नाही, उलटपक्षी सत्य मा. कोर्टाचे समोर येणार आहे. म्हणून प्रतिवादी यांनी नि.क्र.६१ वरील आदेशानुसार प्रश्नांची उत्तरे देण्याची होती. यापैकी ४अ व ४ब या प्रश्नांची या ना त्या चुकीच्या व अयोग्य कारणांचा उपयोग करून जाणून–बजून प्रतिवादी हे उत्तर देण्यास टाळाटाळ करत आहेत असे कथन केले आहे.

०२. वादी यांचे पुढे असे कथन की, या प्रश्नांची उत्तरे प्रतिवादी यांनी देणे त्यांच्यावर बंधनकारक असताना व उत्तरे न देण्यासाठी कायद्याचे तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कारणे प्रतिवादीकडे नसताना नि.क्र.६१ चे कामीपूर्वी घेतलेल्या हरकती हुबेहूब तशाच प्रश्न क्र.४अ व ४ब ची उत्तरे टाळण्यासाठी घेऊन प्रस्तुत प्रतिवादी यांनी ही उत्तरे दिलेली नाहीत. तसेच प्रश्न क्र.४ड चे उत्तर देत असताना प्रस्तुत प्रतिवादी यांनी फक्त दिनकर सदाशिव आयरे व सहदेव बाबाजी आयरे या दोघांचा दावा मिळकतीशी संबंध आहे एवढेच नमूद केले असून त्यांचा वादीचे वंशावळीशी कसा व कशाप्रकारे संबंध येतो हे सोयीस्करपणे टाळलेले आहे व अर्धवट उत्तर दिलेले आहे. प्रश्न क्र.४इ चे उत्तर देत असताना प्रस्तुत प्रतिवादी यांनी ज्या इसमांना दावेत आवश्यक पक्षकार करावे याबाबतचे उत्तर दिलेले असून त्यांचा दावेत आवश्यक पक्षकार म्हणून कसा संबंध येतो हे मात्र नमूद करणेचे टाळलेले आहे व अर्धवट उत्तर दिलेले आहे. त्यामुळे

प्रस्तुत प्रतिवादी यांना जर सदरील इसम आवश्यक पक्षकार कसे होतात हे सांगता येत नसेल तर त्या लोकांची नावे कशाच्या आधारे सांगितलेली आहेत. त्यामुळे याही प्रश्नाचे उत्तर प्रस्तुत प्रतिवादीस माहीत असेल तर ते अर्धवट न देता पूर्ण द्यावे. या उत्तरांच्या माध्यमातून मा. कोर्टात सत्य माहिती सादर करणे बंधनकारक असताना प्रस्तुत प्रतिवादी माहिती लपवत आहेत, उत्तर देत नाहीत ही बाब गंभीर आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रश्नावली संचातील काही प्रश्नांची उत्तरे कोणत्याही योग्य कारणाविना दिलेली नाहीत व ज्या काही प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत ते अर्धवट असल्यामुळे प्रतिवादी हे स्वच्छ हेतूने या कामी वागत नाहीत. त्यामुळे प्रतिवादींनी या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आदेश व्हावा यासाठी वादीने हा अर्ज दिलेला आहे. या अर्जाद्वारे वादीने प्रतिवादीने नि.क्र.६१ येथील अर्जामध्ये टाळलेला प्रश्न क्रमांक ४अ व ४ब या प्रश्नांची उत्तरे व ४ड व ४इ या प्रश्नांची स्पष्ट व पूर्ण उत्तरे प्रतिवादी क्र.१, ३, ४ व ५ यांनी संयुक्तरीत्या अगर वैयक्तिकरित्या शपथेवर देणेबाबत आदेश व्हावा म्हणून सदरचा अर्ज दिलेला आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांनी नि.क्र. ९८ येथे लेखी युक्तीवाद दाखल करून वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीचे नुसार वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुद्ध वाटपाकरिता तसेच हक्कसोड दस्त क्र.१२४५/२०१५ व १२४४/२०१५ रद्द होऊन मिळण्याकरता दाखल केलेला आहे. वादीने नि.क्र.६१ येथे दिलेल्या अर्जास प्रतिवादी क्र.१, ३, ४, ५ यांनी यापूर्वीच आपल्या कैफीयतीद्वारे उत्तरे दिलेली आहेत. सदरची उत्तरे योग्य असून सदरची उत्तरे अर्धवट स्वरुपाची, कोणताही बोध उत्पन्न होत नसल्याचा वादी यांचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे, या उत्तरांमुळे कोणताही गोंधळ निर्माण होत नसून अर्जात नमूद केलेला मजकूर बनावट आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११ नियम ६ मधील तरतुदीनुसार प्रतिवादी यास प्रश्नसंचास उत्तर देण्यास हरकत घेण्याचा अधिकार असल्याची तरतूद आहे. वादीने विचारलेले प्रश्न हे सर्व पुराव्याचा भाग असून वादीने आपल्या दाव्यात नमूद केलेली वस्तुस्थिती शाबीत करण्याची आहे. या कारणास्तव वादीने प्रतिवादी यास विचारले प्रश्न सद्यस्थितीत अगर दाव्याची स्टेज पाहता योग्य ठरत

नाहीत. या कारणामुळे प्रतिवादीने दिलेली उत्तरे व हरकती योग्य आणि बरोबर आहेत असे कथन केले आहे.

०४. प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांचे पुढे असे कथन की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११ नियम ९ मधील परिशीष्ट C मधील फॉर्म क्र.३ पहिला असता, त्यांना वादीने विचारलेल्या प्रश्नास हरकत नोंदविण्याचा अधिकार असल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११ नियम ११ पाहिला असता, वादीने कोर्टात दाखल केलेला अर्ज हा निव्वळ वादीने प्रतिवादी यांच्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नसेल अगर दिलेले उत्तर अपुरे असेल अशा वेळेस लागू ठरणारा आहे. वादीने त्याच्या प्रश्नावलीमध्ये विचारलेले प्रश्न क्र.४अ व ४ब यास उत्तर देण्यास प्रतिवादीने हरकत नोंदवली आहे व सदरच्या हरकतीची कारणे देखील नोंदवली आहेत. वादीने ४ड येथे दिनकर सदाशिव आयरे व सहदेव बाबाजी आयरे या दोघांचा दावा मिळकतीत हक्कसंबंध नाही हे मान्य आहे का ? व मान्य नसेल तर दिनकर व सहदेव या लोकांचा वादीच्या वंशावळीशी व दावा मिळकतीशी कसा हक्कसंबंध येतो असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नास प्रतिवादी यांनी उत्तर देताना वर नमूद दोन्ही व्यक्तिंचा दावा मिळकतींशी हक्कसंबंध आहे. परंतु वादीने दिलेली वंशावळ अपुरी व चुकीची असल्याने त्या लोकांचा वादीच्या वंशावळीशी असलेला संबंध नमूद करणे अडचणीचे झाले आहे असे कथन केले आहे. वादीने विचारलेल्या ४इ येथे प्रश्नास देखील योग्य उत्तरे दिलेली आहेत. प्रतिवादीच्या मते ४इ या प्रश्नास दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने सदर उत्तरात नमूद व्यक्ती हे दावा मिळकतीत सहहिस्सेदार असल्याने ते या दावा मिळकतीत आवश्यक पक्षकार ठरतात असे उत्तर दिलेले आहे. अशाप्रकारे प्रतिवादीच्या मते प्रतिवादीने योग्य प्रकारे सर्व प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली असल्यामुळे पुन्हा त्याच प्रश्नांची उत्तरे देण्यास त्यांना भाग पडता येणार नाही म्हणून सदरचा अर्ज नामंजूर करावा असे प्रतिवादीने कथन केले आहे.

०५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज, त्यावरील म्हणणे व या अर्जाचे नि.क्र.९८ येथे वादी यांनी दिलेला लेखी युक्तिवाद वाचला. यापुर्वी

नि.क्र.६१ येथे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११ नियम ११ प्रमाणे प्रतिवादी क्र.१, ३, ४ व ५ यांनी प्रश्नावलीसाठी अर्ज दिला होता. सदरचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येऊन या प्रश्नावली पैकी अ ब ड ई या प्रश्नांची उत्तरे प्रतिवादी क्र.१, ३ व ५ यांनी द्यावे असे आदेशित करण्यात आले होते. या आदेशाप्रमाणे निशाणी नि.क्र.७९ येथे प्रतिवादीने या प्रश्नावलीचे उत्तरे शपथेवर दाखल केलेली दिसून येतात. नि.क्र.७९ येथे वादीने दिलेल्या उत्तरामध्ये ४अ येथे विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यास प्रतिवादीने हरकत नोंदवली आहे. प्रतिवादीने सदरची हरकत नोंदवताना या हरकतीचे कारण वादीने प्रस्तुत दावा वाटपाकरीता दाखल केला आहे, वादीने दाव्याच्या परिच्छेद क्र.२ मध्ये वेगवेगळ्या वंशावळी नमूद केल्या आहेत व वादी याने दाव्याच्या परिच्छेद क्र.४ येथे वादी यांचे म्हणणे असे की वर नमूद सर्व मिळकती या सर्व हिंदू एकत्र कुटुंबाच्या वाटपाने विभाजन न झालेल्या सामाईक मालकीच्या सामाईक ताबा कब्जाच्या वहिवाटीच्या आहेत असे नमूद केले आहे, भारतीय पुरावा कायदा कलम १०१ नुसार एखाद्या व्यक्तीने त्याच्या कथनात नमूद केलेल्या वस्तूस्थितीवर मे. न्यायालयाने विश्वास ठेवून त्याच्या कायदेशीर हक्काबाबत निकाल द्यावा अशी अपेक्षा असेल तर त्याने सदरची बाब प्रथमत: पुराव्यानिशी शाबीत करायची आहे. त्यामुळे वादीने त्याचे प्रश्नसंच ४अ येथे विचारलेली बाब ही पुराव्याचा भाग असल्याने सदरच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास प्रतिवादी यांनी हरकत नोंदवल्याचे दिसून येते.

०६. वादीचे प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४ब येथे विचारलेल्या प्रश्नास प्रतिवादीने उत्तर देण्यास हरकत नोंदवली. त्या हरकतीचे कारण प्रतिवादीने वरील प्रमाणेच दिल्याचे दिसून येते. प्रश्नावली प्रश्न क्र.४ड येथील प्रश्नाचे उत्तर दिनकर सदाशिव आयरे व सहदेव बाबाजी आयरे या दोघांचा दावा मिळकतीशी संबंध आहे. मात्र वादीने दिलेली वंशावळ चुकीची व अपुरी असल्याने या लोकांचा वादीचे वंशावळीशी असलेला संबंध नमूद करणे अडचणीचे झाले आहे. मात्र त्यांचा या दावा मिळकतीशी संबंध हा दावा मिळकती या त्यांच्या वाडवडिलांपासून चालत आलेल्या असल्याने येतो असे दिल्याचे दिसून येते.

०७. प्रतिवादीने पुढे वादीने विचारलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४इ येथे विचारलेल्या प्रश्नास प्रतिवादीचे कथनानुसार सदर दाव्यात दिनकर सदाशिव आयरे, हरि सदाशिव आयरे, विजया गोपाळ कोलते, अनिता आकाराम मोरे, सहदेव बाबाजी आयरे हे मयत झाले असून त्यांना रुक्मिणी सहदेव आयरे, वंदना सहदेव आयरे, शांती सहदेव आयरे, कल्पना सहदेव आयरे, नंदा सहदेव आयरे हे वारस आहेत. प्रभावती बाळकृष्ण आयरे, राजेंद्र बाळकृष्ण आयरे, गणेश बाळकृष्ण आयरे, शंकर बाबाजी आयरे, प्रतिभा रमेश राऊत, निर्मला बाबाजी आयरे व दिनकर बाबाजी आयरे हे पक्षकार आवश्यक आहेत असे नमूद करून उत्तर दिल्याचे दिसून येते.

०८. यावरून नि.क्र.६१ येथे यापूर्वीच कोर्टाच्या आदेशाने वादीच्या अर्जानुसार प्रतिवादींना प्रश्नावली देण्यात आली होती व त्याची उत्तरे नि.क्र.६१ च्या अर्जाद्वारे शपथेवर प्रतिवादीने दिले होते असे दिसून येते. ज्या प्रश्नांची उत्तरे प्रतिवादींना देण्यास हरकत होती त्याबाबतची हरकत कारणासहीत प्रतिवादीने नि.क्र.६१ येथे नोंदवल्याचे दिसून येते. तसेच इतर राहिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रतिवादीने दिली होती असे लक्षात येते. त्यामुळे पुन्हा नि.क्र.८० येथे सदरचा अर्ज वादीने देऊन पुन्हा त्याच प्रश्नांची उत्तरे प्रतिवादीकडून मागवली असल्याचे दिसून येते. मात्र प्रतिवादीने यापूर्वीच नि.क्र.६१ येथे सदरच्या प्रश्नांची उत्तरे व त्या प्रश्नांची उत्तरे प्रतिवादी देऊ शकत नाही त्याचे हरकती बाबत त्याने कथन केल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याच प्रश्नांची उत्तरे प्रतिवादीकडून मागवणे योग्य ठरत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश –

– आदेश –

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2025.01.16 18:37:24 +0530

(श्रीमती एन.बी.घाटगे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
देवगड.

दिनांकः १०/०१/२०२५